



Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!






संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784

Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे अंक : २६८ वा शुक्रवार दि. २७ डिसेंबर २०२४ पृष्ठ ८ किंमत ३रुपये


# प्राथमिक आरोग्य केंद्राचे अग्नीशमन सिस्टमला पाण्याची टाकीच जोडलेली नाही, तर कुठे पंप सुद्धा नाही.

## लोणार ग्रामीण रुग्णालया प्रमाणे दुर्दैवी घटना घडल्यास जवाबदार कोण.

**जनसचंलन/लोणार**

आग, पाणी आणि वारा यांचे कधी कोणते रूप पहायला मिळेल सांगता येत नाही त्याला पाहता इमारत बनवलेली असते ज्यात भिंती व छप्पर मुळे पाऊस आणि वाऱ्या पासून संरक्षण मिळते मात्र आगी पाऊण स्वरक्षण साठी अग्नी शमन यंत्र, अग्नी शमन सिस्टम, फायर अलर्ट बसवण्यात आलेले असतात ज्याने सार्वजनिक ठिकाणी आगी पासून बचाव होऊ शकेल त्याला पाहता नवीन इमारतीचे काम होताच त्याला मध्ये अग्नी शमन सिस्टम काम करते का याची पाहणी केली जाते नंतर त्याला इमारतीच्या पूर्णतःवाची शिक्का मार्तब होते मात्र जिल्हा-तील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या अग्नी शमन सिस्टम साठी लागणाऱ्या पाण्याच्या टाक्याच बसवण्यात आलेल्या नाही ज्याने प्राथमिक आरोग्य केंद्रातली अग्नी सुरक्षा वाऱ्यावर आहे.

जिल्हात ५२ प्राथमिक आरोग्य केंद्राचे काम २०१८ ते २०२१ मध्ये पूर्ण झाले बहुतांश प्राथमिक आरोग्य केंद्रात कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केल्या जातात ज्यांचे कॅम्प सध्या मोठ्या प्रमाणात सुरु आहेत तर लसीकरण, प्रसूती, नियमित ओ पी डी मध्ये रुग्ण तप-ासणी त्या साठी रुग्णाला भर्ती करण्यात येते मात्र येथील इमारती मध्ये अग्नी सुरक्षा यंत्रणा कितपत योग्य आहे याची पाहणी केली असता असे दिसून आले की संबंधित ठेकेदाराने प्राथमिक आरोग्य केंद्रात अग्नी शमन साठी यंत्रणा बसवली ज्यात धूपट दिसताच सायरान वाजतो मात्र आग विझवन्या साठी पाणी ला-गते पण त्याला पाण्या साठी पाण्याची टाकीच बसवण्यात आलेली नाही ज्याने आग कशी विझणार हा प्रश्न निर्माण झालेला आहे ही परिस्थिती फक्त डोणगाव येथीलच प्राथमिक आरोग्य केंद्राची नसून संपूर्ण जिल्हात असल्याची माहिती सूत्रांनी दिली जर लोणार ग्रामीण रुग्णालय सारखी घटना प्राथमिक आरोग्य केंद्रात घडली तर त्याला कोण जवाबदार राहणार असा प्रश्न निर्माण होत आहे तर दुसरीकडे प्राथमिक आरोग्य केंद्रात असणारे अग्नी शमन बंब निकामी आहेत का त्याची एक्सपायरी किती असे कित्येक बाबी तपासून पाहणे व त्याची माहिती कर्मचाऱ्यांना देणे गरजेची आहे पण ती दिल्या गेलेली नसल्याचे पाहायला मिळते.





प्राथमिक आरोग्य केंद्रात असलेल्या अग्नी शमन यंत्रणा मध्ये आग विझवन्या साठी पाण्याची टाकी नसल्याने दुर्दैवी घटना घडली तर त्याला कोण जवाबदार रा-हणार आहे त्या सोबतच अग्नी शमन यंत्र, फायर बॉल या सारख्या जीवन रक्षक प्रणा-लीची प्रशिक्षण वेळोवेळी दिल्या जायला पाहिजे त्याचे पोलीस विभागा प्रमाणे मॉक ड्रिल व्हायला हवी मात्र तसे होताना दिसत नाही ज्याने दुर्दैवी घटना घडत रा-हतात ज्यात संबंधित कर्मचारी स्वतःहाचे जीव वाचवेल की इतरांचे प्राण अशी स्थिती सध्या जिल्हातील आरोग्य यंत्रनेची आहे.

(जिल्हातील प्राथमिक आरोग्य केंद्रात मी चार्ज घेण्या अगोदर फायर सिस्टम बसवलेले आहेत मात्र आग विझवण्या साठी लागण-ारे पाणी साठी टाकी खरेदीची प्रक्रिया सुरु असून लवकरच त्याचे काम मार्गी लागेल - डॉ अमोल गिते जिल्हा आरोग्य अधिकारी )

---

# किसको पता हैं सडक का हाल? ठेकेदार मालामाल!

## अहो रस्ता डांबरी आहे का सिमेंटचा हे ही त्या परिसरातील गावकऱ्यांना माहीत नाही हो!

**जनसंचलन/बुलढाणा**

प्रधानमंत्री / मुख्यमंत्री ग्रामसडक योजना अंतर्गत दुसऱ्या जिल्ह्यातील मोठ्या कंत्राटदारांकडून नियमबाह्य काम सुरू असून,यावर लक्ष ठेवणाऱ्या यंत्रणेची तोंडावर बोट व हाताची घडी आहे. विशेषता विदर्भ ते मराठवाड्यात जाणाऱ्या रस्त्यांचे वर्कऑर्डर नियमानुसार नियुक्त इंजिनियर व सुपरवायझर सुरू असलेल्या ( साईड ) कामावर कोणतेही सूचनाफलक नाहीत.संबंधित अधिकाऱ्यांना याबाबत विच-ारले तर त्या साईटवर कोणी इंजिनियर नाहीत अशी माहिती दिली असून सदर कामे वाऱ्यावर असल्याचे दिसून येत आहे. त्या परिसरातील काही शेतकऱ्यांमध्ये नाराजीचा सूर आहे. ग्रामीण भागातील विकास साधण्याच्या दृष्टिने रस्त्यांचे महत्त्व ओळखून केंद्र सरकारच्या वतीने वर्ष २००० मध्ये प्रधानमंत्री ग्रामसडक योजना सुरू करण्यात आली आहे. ही योजना केंद्रीय ग्रामसडक मंत्रालयाच्या अखत्यारीत आहे. या योजनेच्या माध्यमातून देशभरातील दुर्गम भागात असलेली गावे, पक्के रस्ते उभारुन मोठ्या गावांना व शहरांना जोडण्यात येत आहेत.ग्रामीण भागातील लोकसंख्येचे प्रमाण शहरी भागांच्या तुलनेत अधिक आहे. शहरी भागात विविध उद्योग व्यवसायांची प्रगती होत असली तरी त्याचे द्योतक गावातच आहे. उद्योग, व्यवसायवा व्यापार हा शहरी भागात सुरू असला तरी त्यासाठी आवश्यक अस-लेला कच्चा माल अर्थात शेतमालाची निर्मिती ग्रामीण भागातच होत असल्याने शहर ते ग्रामीण भागापर्यंत पोहोचण्यासाठी, शेतमालाची वाह-तूक करण्यासाठी ग्रामीण भागातील रस्ते चांगले असणे आवश्यक आहे.परंतु करोडो रुपयांचे एकूण ११ कामे घेतलेल्या कंत्राटदार सुरवातीच्याच कामात सर्व नियमधाब्यावर बसवून वर्क ऑर्डर नुसार काम करत नसल्याचे चित्र कॅमेरात दिसून येत आहे. ते बिनधास्त बेकायदा काम करीत असून, सर्वच नियम पायदळी तुडवीत आहेत. युवा वर्गाला उचित जागरुकता अभियानाअंतर्गत या कामांवर देखरेख ठेवण्याचे आव-ाहन केले आहे. तसेच सर्व अधिकाऱ्यांना प्रधानमंत्री/ मुख्यमंत्री ग्रामसडक योजने अंतर्गत



सुरू असलेल्या रस्ता कामांच्या गुणवत्-ेवर विशेष लक्ष ठेवण्याचे निर्देश दिले आ-हेत. आशियायी विकास बँकेच्या सहकार्याने एनआरआयडीएद्वारा एक ग्रामीण रस्ते सुरक्षा नियमावली बनविण्यात आली आहे. त्याद्वारे सुरक्षित रस्त्याचे डिझाईन, अपघातांची नोंद, रस्ता सुरक्षा ऑडिट चेकलिस्ट, जागरुकता, आणि लोकशिक्षण आदींचा समावेश आहे.


दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# वनस्टॉप सेंटरमध्ये महिला समुपदेशकास मारहाण


जनसंचलन/बुलढाणा

येथील वनस्टॉप सेंटरमध्ये अनैतिक देह व्यापार प्रकरणाच्या आरोपात ठेवण्यात आलेल्या एका महिलेने महिला समुपदेशकासह मारहाण केल्याची घटना २४ डिसेंबर रोजी घडली. याप्रकरणी महिला समुपदेशकाच्या तक्रारीवरून पोलिसांनी संबंधित महिलेविरोधात गुन्हा दाखल केला आहे. कौटुंबिक तथा अन्य कारणामुळे हिंसेमध्ये पीडित झालेल्या महिलांसाठी सखी वनस्टॉप सेंटर आहे. येथे महिलांना समुपदेशनाचीही सेवा पुरविल्या जातात. या सेंटरमध्ये गेल्या दोन महिन्यांपासून अनैतिक देह व्यापार प्रकरणातील चार महिलांना ठेवण्यात आले होते. २४ डिसेंबर रोजी सकाळी कर्तव्यावर आलेल्या महिला समुपदेशकावर त्यातील एकीने महिलेने अचानक हल्ला करून रूमची चावी मागितली. समुपदेशक महिलेस या महिलेने गंभीर मारहाण केली. प्रकरणी पोलिसानी गुन्हा दाखल केला.




# श्री स्वामी समर्थ नागरी सहकारी पतसंस्थेचे नव वर्षाचे कॅलेंडरचे डॉक्टरांच्या हस्ते विमोचन...

## अध्यात्मिक वातावरणामध्ये चालते बँकेचे कामकाज....



जनसंचलन/बुलढाणा

बुलढाणा शहरामध्ये अनेक पतसंस्था आहे मात्र यामध्ये एक नाव येते ते म्हणजे श्री स्वामी समर्थ नागरी सहकारी पतसंस्था बुलढाणा यांचे कारण ही तसेच आहे. आज २६ डिसेंबररोजी श्री स्वामी समर्थ नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने एक कॅलेंडर काढण्यात आले त्याचा विमोचन सोहळा हा डॉक्टरांच्या हस्ते करण्यात आला. या सोहळ्यामध्ये बुलढाणा शहरातील नामांकित डॉक्टर उपस्थित होते. डॉक्टरांनी सुद्धा या अध्यात्मिक वातावरणामध्ये येऊन आपल्या प्रतिक्रिया या प्रसारमाध्यमासमोर मांडल्या आहे. याव्यतिरिक्त या बँकेमध्ये सकाळपासूनच आध्यात्मिक वातावरणाची सुरुवात होते ते म्हणजे सकाळी या बँकेमध्ये श्री स्वामी समर्थ महाराज यांची आरती करण्यात येते त्यानंतर कामकाजाला सुरुवात करण्यात येते. या अगोदर सुद्धा बँकेच्या वतीने ३ वेळा कॅलेंडर काढण्यात आले आहे. बँकेच्या वतीने अनेक विविध उपक्रम राबविल्या जातात त्यामधला एक अनोखा उपक्रम म्हणजे श्री स्वामी समर्थ महाराजांची सेवा अर्थातच बँकेमध्ये नवदम्पत्याच्या हस्ते श्री स्वामी समर्थ महाराज यांची पूजा करून आरती करण्यात येते. तसेच एक दिवशीय गुरुचरित्र पारायण सोहळा साठी बुलढाणा येथून ५० सेवेकरी बँकेच्या वतीने निशुल्क त्र्यंबकेश्वर येथे घेऊन जाण्यात येते. त्या ठिकाणी त्यांच्याकडून पारायण करून घेण्यात येते. या पारायण यामुळे त्यांच्या घरातील तसेच आर्थिक सर्व समस्या दूर होतात असे सेवेकरी यांचे म्हणणे आहे. बँकेच्या वतीने हा अनोखा उपक्रम घेण्यात येतो. जुलैपासून हा उपक्रम बँकेच्या वतीने राबविण्यात येतो आतापर्यंत बँकेच्या वतीने २५० सेवेकरी घेण्यात आले आहे. अशी माहिती श्री स्वामी समर्थ नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष गजानन राऊत यांनी दिली आहे. यावेळी डॉ. गोपाल उबरहंडे, डॉ दीपक बढे, डॉ अंशुमान जयस्वाल, डॉ दिपाली अंशुमान जयस्वाल, बँकेचे अध्यक्ष गजानन राऊत, बँकेचे कार्यकारी संचालक दादाराव मोरे, तसेच कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

# रामदास आठवलेंच्या वाढदिवसाच्या निमित्त वृद्धाश्रमात कपडे व धान्य वाटप..

जनसंचलन/ चिखली

केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री तथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया चे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले यांच्या वाढदिवसा निमित्त तुकाराम आश्रय वृद्धाश्रमातील वृद्धाना कपडे व धान्य वाटप. ऋणानुबंध समाज विकास संस्था चिखली द्वारा संचालित मानवसेवा प्रकल्प अंतर्गत विना अनुदानित तुकाराम आश्रय वृद्धाश्रम, भोकर ता चिखली जिल्हा बुलडाणा येथे निराधार बेघर वयोवृद्ध आजी आजोबा यांची निःस्वार्थ पणे गेल्या दोन वर्षांपासून सर्व प्रकारे मोफत सेवा देणे सुरु आहे. हि सेवा दानवीर लोकांनी दिलेल्या दानावर सुरु असल्याने येथील निराधार वृद्धाच्या सेवे करीता केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले यांच्या वाढदिवसाच्या निमित्त रिपाई बुलडाणा जिल्हा व चिखली तालुक्यातील सर्व पदाधिकारी यांनी धान्य व कपडे वाटप करून एक प्रकारे सेवा दिली आहे. यावेळी कार्यक्रम चे अध्यक्षसौं वंदना ताई वाघ जिल्हा अध्यक्षा महिला आघाडी तर प्रमुख मार्गदर्शक प्रा मुक्तार खान पठाण हे होते. तर प्रमुख उपस्थिती मध्ये चिखली तालुका अध्यक्ष हिम्मतरावं जाधव, ता उपाध्यक्ष फकिरा निकाळजे प्रकाश पाटील म्हस्के दीपक साळवे हे होते. निराधारांची सेवा म्हणजे खरे पुण्यांचे काम असून या सामाजिक कार्याला हातभार लावण्यासाठी दान शूर व्यक्ती नि समोर आले पाहिजे असे मत प्रा मुक्तार पठाण यांनी केले. तसेच रिपाई चिखली तालुक्याच्या वतीने आज निराधारांसाठी छोटीशी मदत देत आहोत परंतु भविष्यात माझ्या संपर्कातील दात्याच्या माध्यमातून वृद्धाश्रमाला शक्य ती मदत करण्यात येईल व नामदार रामदास आठवले यांच्याकडुन काही मदत मिळेल या साठी प्रयत्न करू असे हिम्मतरावं जाधव यांनी आश्वासन दिले. यावेळी विजय गायकवाड, विशाल गवई, मच्छिन्द्र मघाडे, रमेश साळवे उमरसिंग सुरडकर, कमलबाई सुरडकर, उषा इंगळे, रुपाली कांबळे, रचना जाधव, मीरा जैस्वाल, अर्चना बोर्डे यांची उपस्थिती होती. रिपाई च्या वतीने निराधार बेघर वयोवृद्ध यांच्या सेवेकरिता धान्य व किराणा वाटप केल्याबद्दल आलेल्या सर्व मान्यवरांचे आभार प्रदर्शन वृद्धाश्रमाचे संचालक प्रशांत डोंगरदिवे व संचालिका रुपाली ताई डोंगरदिवे यांनी केले.



दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# सहकार विद्या मंदिरमध्ये सांस्कृतिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

**जनसंचलन/बुलढाणा**

स्थानिक बुलडाणा अर्बन चॅरीटेबल संस्थेमध्ये सहकार विद्या मंदिर या सी.बी.एस.ई. मान्यता प्राप्त व सहकार विद्या मंदिर व ज्यु. सायन्स कॉलेजचा सांस्कृतिक स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम एकत्रीतपणे मोठा उत्साहात संपन्न झाला. असंख्य नयनरम्य कार्यक्रमाची रेलचेल असलेला हा सोहळा विद्यार्थी वर्ग व अवघ्या महाराष्ट्रातुन तसेच शेजारील राज्यातुन आलेल्या पालकांसाठी मोठी पर्वणी होता. या सांस्कृतिक कार्यक्रमाच्या निमित्ताने पालकांनी तीन दिवस विविध अविस्मरणीय सांस्कृतिक कार्यक्रमांचा आस्वाद घेतला. शालेय जिवनात स्नेहसंमेलन महणजे विद्याथ्र्यांच्या आयुष्यातील सुखद क्षण असतात. सहकार विद्या मंदिर मध्ये विद्याथ्र्यांना हे ऐतिहासिक आनंदाचे क्षण आयुष्यभर सोबत रहावे यासाठी योग्य व्यासपीठ उपलब्ध करुन देण्यात येते. दि.२१ डिसेंबर रोजी विद्याथ्र्यांचे सहकार सांस्कृतिक भवनामध्ये हे संमेलन होते. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणुन बुलढाणा जिल्हा अधिक्षक राज्य उत्पादन शुल्क श्री. डॉ. पराग नवलकर साहेब, ए.आर.टी.ओ. श्री. नागनाथ महाजन साहेब, तर अध्यक्षस्थानी बुलढाणा अर्बनचे मुख्य कार्यकारी संचालक डॉ.सुकेश झंवर सर, संस्थेच्या अध्यक्षा सौ. कोमल झंवर मॅडम, बुलढाणा अर्बनचे संचालक श्री. केडीया सर व श्री. चिराणीया सर यांची मंचावर विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरवात




सरस्वती पुजनाने झाली. याप्रसंगी डॉ. झंवर सर यांनी शाळेत सुरु असलेल्या विविध उपक्रमाची माहिती देत निट व आयआयटी चे परीक्षाचे उत्कृष्ट शिक्षण देणारे शैक्षणिक हब सहकार विद्या मंदिरमध्ये निर्माण करण्यात येईल याची ग्वाही उपस्थितांना दिली. प्रमुख पाहुण्यांनी आपल्या भाषणात सहकार विद्या मंदिर विद्याथ्र्यांच्या सर्वांगिण विकासासाठी करीत असलेलया प्रयत्नाचे कौतुक केले. यानंतर हजारोंच्या संख्येने आलेला पालकवर्ग, भव्य रंगमंच, आधुनिक तंत्रज्ञानाने सज्ज अशी ध्वनी व्यवस्था, प्रकाश योजना अश्या वेगवेगळ्या वैशिष्टासह कार्यक्रमास सुरुवात झाली. सहकार सांस्कृतिक रंगमंचाच्या भव्य व्यासपीठावर विविध नृत्य अविष्कार दाखवित उपस्थितांची मने जिंकली. यावेळी वर्ग नर्सरी , वर्ग २ री, ५ वी व ८ वी च्या विद्याथ्र्यांनी अप्रतिम नृत्य सादर करीत पालकांना मंत्रमुग्ध केले. वेगवेगळे देखावे तसेच समाज प्रबोधनासहीत विविध सामाजिक विषयावर नृत्य सादर करण्यात आले. याप्रसंगी वर्ग ९ वी व १० वीच्या विद्याथ्र्यांनी विज्ञान प्रदर्शनी व लज्जतदार व खमंग अशा विविध पदार्थाचे स्टॉल लावलेले होते. याप्रसंगी विद्याथ्र्यासोबतच पालकांना देखील त्यांच्या अंगीभुत कला दाखविण्याकरीता व्यासपीठ उपब्ध करुन देण्यात आले होते. पालकांनी सादर केलेले विविध नृत्य!! सहकार विद्या मंदिरने भव्य रंगमंचावर पालकांनादेखील नृत्य सादर करण्यास आमंत्रित केले होते. पालकाची देखील उत्कृष्ट प्रतिसाद देत सर्वोत्तम नृत्ये सादर केलीत. शाळेने राबविलेल्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. या कार्यक्रमाच्या सुत्रसंचालनाची धुरा कु.पुजा पाठक, सौ.भाग्यश्री देशपांडे यांच्यासह विद्याथ्र्यांनी सांभाळली. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी बुलडाणा अर्बन अध्यक्षा सौ.कोमल झंवर यांनी मार्गदर्शन केले. तर प्राचार्य,मुख्याध्यापक, प्रशासकिय अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, सर्व शिक्षकवृंद व कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले. याप्रसंगी शालेय प्रशासनातर्फे पालकांचे विशेष आभार मानण्यात आले.

# दक्षता व भ्रष्टाचार निर्मूलन समितीची सभा

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्हा दक्षता समितीची सभा जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहामध्ये सोमवार, दि. ३० डिसेंबर रोजी दुपारी ४ वाजता आयोजित करण्यात आली आहे. तसेच भ्रष्टाचार निर्मूलन समितीची सभा मंगळवार, दि. ३१ डिसेंबर रोजी दुपारी ४ वाजता घेण्यात येणार आहे.

जिल्हा दक्षता समिती सभा तसेच जिल्हा भ्रष्टाचार निर्मूलन समितीची सभा यात ज्या व्यक्तींना तक्रारी दाखल करावयाच्या असतील त्यांनी प्रतिज्ञालेखासह तक्रारी स्पष्ट शब्दात सबळ पुराव्यानिशी समिती समोर दाखल करावे, असे आवाहन सामान्य प्रशासन विभागाच्या तहसिलदार यांनी केले आहे.

# माजी सैनिकांनी विविध क्षेत्रामध्ये प्राविण्यप्राप्त केले असल्यास

## जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयास भेट द्यावी.

**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

जिल्हयातील सर्व माजी सैनिकांना कळविण्यात येते कि ज्या माजी सैनिकांनी वर्ष २०२४ मध्ये खेळामध्ये, संभाषनामध्ये,वैज्ञानिक प्रक्रियेमध्ये, किंवा एखादया तंत्रज्ञानामध्ये अशा विविध क्षेत्रामध्ये विशेष प्राविण्यप्राप्त केले असेल किंवा ऊत्कृष्ट कामगिरी केलेली असेल अशा सर्व माजी सैनिकांनी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय यांच्याकडे खालील दिलेल्या नमुण्याप्रमाणे रकान्यामध्ये आपली माहिती भरुन दिनांक २ जानेवारी २०२५ पर्यंत जमा करावी,असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, बुलढाणा यांनी केले आहे. आपले नाव व पत्ता , ऊत्कृष्ट कामगिरी केलेले क्षेत्र, आपल्या उपलब्धीचे वर्णन १०० शब्दामध्ये, फोन नंबर, स्वता:चा फोटो, व शेरा. या रकान्यामध्ये आपली माहिती भरुन दि. ०२ जानेवारी २०२५ पर्यंत जमा करावी.

# खंडाळा तलावातून सोडले पाणी शेतकऱ्यांना दिलासा

**जनसंचलन/ किनगाव**

खंडाळा तलावातून रब्बी हंगामातील पिकांच्या सिंचनाकरिता दि. २३ डिसेंबर रोजी पाणी सोडण्यात आले आहे. त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. चिखला गावाजवळील खंडाळा तलाव तुडुंब भरलेले आहे. मुबलक पाणी उपलब्ध असल्याने रब्बी हंगामातील गहू हरभरा तूर इतर पिकाकरिता तातडीने नियोजन करून लवकर पाणी सोडण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली होती. यावर्षी ऐन हंगामात परतीच्या पावसाने कहर केल्यामुळे सोयाबीन, कपाशी, तूर, उडीद, मूग या पिकाची नासाडी झाली. त्यामुळे उत्पादनात कमालीची घट झाली होती, तर वाचलेल्या मालाला योग्य भावसुद्धा मिळत नसल्याने शेतकऱ्याचे आर्थिक बजेट कोलमडले आहे. खरीप हंगामानंतर शेतकऱ्याची मदार रब्बी हंगामावर असते. यावेळी कॅनॉल इन्स्पेक्टर शिंदे, लाकडे तसेच शेतकरी सय्यद मकसूद, देवीदास आडे, नारायण राठोड, कडुबा मुळे, राम आडे आदी उपस्थित होते.

# १५ लाखांसाठी विवाहितेचा छळ...

**जनसंचलन/ शेगाव**

येथील माहेर असलेल्या २७ वर्षीय विवाहितेला तिच्या पती व सासरच्या लोकांनी १५ लाख रुपयांच्या हुंड्याची मागणी करीत मानसिक व शारीरिक छळ करून तिला घरातून हाकलून दिल्याची तक्रार शहर पोलिसात करण्यात आली. त्यावरून पुण्यातील कात्रज येथे राहणाऱ्या चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. विवाहितेच्या तक्रारीनुसार, तिचा पती धनंजय रमेश ठाकूर (३८), सासू अर्चना रमेश ठाकूर (६१), सासरे



रमेश राजाराम ठाकूर (६५), दीर अभिजित रमेश ठाकूर (२५) यांनी एकत्रितपणे हुंड्याच्या मागणीसाठी वारंवार छळ केल्याचे म्हटले. याप्रकरणी शेगाव शहर पोलिस ठाण्यात भारतीय दंड संहितेच्या कलम ४९८ (अ), ३२३, ५०४, ५०६ (३४) तसेच हुंडा प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा करण्यात आला आहे. तपास शेगाव शहर ठाणेदार नितीन पाटील यांच्या मार्गदर्शनात हेकॉ संजय करुटले करीत आहेत.



# नववर्षाच्या पार्श्वभुमीवर राज्य उत्पादन शुल्क विभाग सक्रीय...

## अवैध मद्य विक्री, वाहतूक प्रकरणी तक्रार नोंदविण्याची आवाहन...




**जनसंचलन/बुलढाणा**

नववर्षाच्या आगमनाच्या पार्श्वभुमीवर जिल्ह्यातील विविध भागात अवैध वाहतुक तसेच विक्री मोठ्या प्रमाणात होतात. अशा घटनाना प्रतिबंध घालण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत दि. ३१ डिसेंबरपर्यंत विशेष मोहिम राबविण्यात येत आहे. तथापि कोणत्याही अनुज्ञप्तीमध्ये विना परवाना मद्यविक्री किंवा अल्पवयीन तरुणांना दारु उपलब्ध होत असल्यास अशावर राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून कडक कारवाई केली जाणार आहे. तसेच नागरिकांनादेखील काही तक्रारी असल्यास विभागाशी संपर्क करावा, असे आवाहन राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक डॉ. पराग मो.नवलकर यांनी केले आहे. नाताळ व नववर्ष आगमनाच्या अनुषंगाने राज्य उत्पादन शुल्क बुलढाणा कार्यालयाच्यावतीने अवैध मद्य निर्मिती, वाहतुक व विक्री वर प्रतिबंध घालण्यासाठी बुलढाणा जिल्ह्यातील कार्यक्षेत्रीय अधिकारी निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, बुलढाणा, राज्य उत्पादन शुल्क देऊळगाव राजा व राज्य उत्पादन शुल्क खामगाव व राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक यांच्याकडून जिल्ह्यातील विविध हातभट्टी ठिकाण, अवैध मद्यविक्री केंद्रावर छापे टाकुन कारवाई करणे चालु आहे. तसेच नववर्षाच्या अनुषंगाने आयोजित करण्यात येणाऱ्या पाट्या, हॉटेल्समध्ये होणारी मद्यविक्री यावर राज्य उत्पादन शुल्क विभागाची करडी नजर असणार आहे. गेल्या नऊ महिण्यात २ कोटी २८ लक्ष रुपयांचा मुद्देमाल जप्त राज्य उत्पादन शुल्क विभागाने अवैध विक्री, मद्यनिर्मीती व वाहतुक प्रकरणी दि. १ मार्च २०२४ पासून ते आजपर्यंत विशेष मोहिम राबवून २ कोटी २८ लक्ष ४६ हजार १७९ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आले आहेत. यामध्ये १ हजार २२९ व्यक्तीवर गुन्हे दाखल करण्यात आले असून १०४ वाहन जप्त करण्यात आले आहे, अशी माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक डॉ. पराग मो. नवलकर यांनी दिली आहे. सदर कारवाई राज्य उत्पादन शुल्क आयुक्त विजय सूर्यवंशी, संचालक प्रसाद सुर्वे साहेब व विभागीय उप-आयुक्त अर्जुन ओहोळ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेली आहे. शासनाच्या नियमानुसार दारु पिण्यासाठी मद्यसेवन परवाना असणे आवश्यक आहे. बुलढाणा जिल्ह्यातील परमीट रुम, बीअरबार, वाईन शॉप, देशी दारु दुकानचालक यांना त्याबद्दल सक्त सुचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच मद्यसेवन परवाना नसल्यास व्यक्तीला व अल्पवयीन तरुणांना मद्यविक्री केल्यास अनुज्ञप्तीधारकांवार कारवाई केली जाईल, असा इशारा देण्यात आला आहे. अवैध मद्यविक्री करणाऱ्या हॉटेल्स, ढाब्याबाबत, अवैध मद्यनिर्मीती वाहतुकीबाबत माहीती देण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाकडील टोल फ्री नंबर १८००२३३९९९९ किंवा व्हॉटसॲप नंबर ८४२२००११३३ वर किंवा excisesuvidha.mahaonline.gov.in या विभागाचे पोर्टलवर तात्काळ माहिती द्यावी.

# अल्पवयीन गर्भवतीने सखी वन स्टॉपच्या महिला सुरक्षा रक्षकाच्या हातावर दिली तूरी !

## ३५ वर्षीय युवकासोबत दुचाकीवरून झाली सैराट!

**जनसंचलन/बुलढाणा**

येथील सखी वन स्टॉपच्या एका महिला सुरक्षा रक्षकाने एका अल्पवयीन ५ महिन्याच्या गर्भवतीला शासकीय रुग्णालयात उपचार करून परत आणत असताना, रुग्णालयाच्या गेट जवळूनच हाताला झटका देत सदर अल्पवयीन गर्भवती एका अज्ञाताच्या दुचाकीवर बसून फरार झाल्याची घटना समोर आली आहे. पोलीस तक्रारीनुसार, हकीकत अशी आहे की, बुलढाणा येथील सखी वन स्टॉप येथे कार्यरत महिला सुरक्षा रक्षक ह्यांनी महिला सीए यांच्या आदेशाने एका सखी वन स्टॉप येथे दाखल असलेल्या १६ वर्षीय पीडित मुलीला पोटात दुखत असल्यामुळे तिला शासकीय रुग्णालयात उपचारासाठी नेले होते.पिडीत मुलगी ही ५ महिन्याची




गर्भवती होती. तिचा उपचार झाल्यानंतर रुग्णालयातून बाहेर पडत असताना रुग्णालयाचे गेट जवळ सुरक्षा रक्षक महिला कर्मचारी दुकानातून बिस्किट विकत घेत असताना, पीडितने हाताला झटका देत पळ काढला आणि एका ३० ते ३५ वर्षीय युवकाच्या दुचाकीवर बसून फरार झाली. याप्रकरणी शहर पोलीस ठाण्यात तक्रार देण्यात आली असून अज्ञात आरोपी विरुद्ध कलम १३७ (२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..



| गुंतवणूक रक्कम | | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | गुंतवणुक कालावधी महिने | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३९१९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | - |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | - |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे

पुन्हा एकदा...
सुकन्या लक्षाधीश ठेव योजना



गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे
सुकन्या लक्षाधीश ठेव योजना
जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली
मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा
फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४